N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर

**P.S.(ठाणे):** उल्हासनगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0004

**Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/01/2026 11:43

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Date From (दिनांक पासून):** 02/01/2026

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date To ( दिनांक पर्यंत):** 02/01/2026

**Time From (वेळेपासून):** 17:50 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:19 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 03/01/2026 **Time (वेळ):** 11:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 021

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/01/2026 11:43 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

**Beat No. (बिट क्र.):**

पश्चिम

(b) **Address (पत्ता):** अधिकारी कक्षामध्ये,उल्हासनगर पोलीस स्टेशन

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रुपाली सुनिल पोळ पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा ठि सी-01, 1/2, सेक्टर नं 01,सीबीडी बेलापुर, ,नवी मुंबई ,सी बी डी बेलापूर,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा ठि सी-01, 1/2, सेक्टर नं 01,सीबीडी बेलापुर, ,नवी मुंबई ,सी बी डी बेलापूर,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** नोकरी

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9763922295

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय धोंडिराम बिडगर | | | 1. जनार्दन पोवळेकर चाळ,,शहाड गांवठान कोळीवाडा, , उल्हासनगर - 01, , उल्हासनगर,ठाणे शहर,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

सापळा पुर्व व सापळा कारवाई करून तात्काळ दाखल

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

FIR NO-04/2026 फिर्याद दिनांक:- 03/01/2026.

मी रुपाली सुनिल पोळ, वय-40 वर्षे, धंदा - नोकरी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे, रा. ठि. सी-01, 1/2, सेक्टर नं 01, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई मो. नं. 9763922295 सरकार तर्फे फिर्याद देते की,

मी वरील प्रमाणे असून मी सन 2011 साली पोलीस उप निरीक्षक म्हणुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाव्दारे सरळसेवेतुन भरती झाले असुन, सध्या सप्टेंबर 2024 रोजी पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दिनांक 02/01/2026 रोजी मी कार्यालयात हजर असतांना मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र ठाणे यांनी श्री दिनकर लक्ष्मण फुंदे यांची लाचेच्या मागणीबाबत तक्रार असल्याचे सांगून त्यांचे तक्रारीचे अनुशंगाने पडताळणी करुन पुढील सापळा कारवाई करण्याबाबत सुचना दिल्या.

त्यानुसार श्री दिनकर लक्ष्मण फुंदे, वय - 57, रा. कमला नेहरूनगर, धोबीघाट, शितलामाता मंदिर शेजारी, उल्हासनगर नं.1, ठाणे मो. 9673643242 यांचा त्यांचे सांगणेप्रमाणे लेखी तक्रार असुन त्यात त्यांचे थोडक्यात सांगणे की,

'' मी वरील प्रमाणे असुन, मी लेबर कॉन्ट्रकर म्हणुन काम करतो. वर नमुद पत्यावर मी माझी पत्नी, मुलगा असे राहण्यास आहोत. दि. 19/12/2025 रोजी रात्री 10.30 वा सुमारास आमचे एरीयातील एका व्यक्ती सोबत किरकोळ मारामारीतुन दि. 20/12/2025 रोजी उल्हासनगर पोलीस स्टेशन येथे माझा मुलगा, पुतन्या, माझी पत्नी व माझेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचा गुन्हा नंबर उल्हासनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नंबर 1022/2025 भान्यासं चे कलम 118(2), 115(2), 352, 189 (2), 190, 191(1), 191(2), 191 (3) सह मपोका कलम 37(1), 135 प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयामध्ये माझा मुलगा शिवम फुंदे व पुतन्या अमित फुंदे यांना अटक करण्यात आलेली होती. सध्या मुलगा व पुतन्या यांना मा. न्यायालयाने जामीनावर सोडले आहे. दि. 20/12/2025 रोजी मी उल्हासनगर पोलीस स्टेशन येथे जावुन तपास अधिकारी श्री संजय बिडगर, सहा पोलीस निरीक्षक व दुसरे एक पोलीस अधिकारी श्री यादव यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी मला सांगीतले की, एक लाख रुपये दिले तर मला व माझे पत्नीस अटक करणार नाही असे सांगीतले. त्यावेळी मी घाबरुन श्री यादव पोलीस अधिकारी यांना 25 हजार रुपये दिले त्यावेळी त्यांनी मला सोडुन दिले.

त्यांनतर मला दि. 31/12/2025 रोजी उल्हासनगर प्रभाग समीती येथे असते वेळी सदर गुन्हयाचे तपास अधिकारी श्री संजय बिडगर, सहा पोलीस निरीक्षक यांनी यांनी ताब्यात घेतले. सदर वेळी श्री यादव पोलीस अधिकारी हे देखील होते. त्यावेळी श्री संजय बिडगर यांनी मला 15 हजार दया तुम्हाला कोर्टामध्ये हजर करुन लगेच जामीन करुन देतो असे सांगीतले. त्यावेळी लगेच श्री यादव यांनी मला श्री बिडगर यांना 15 हजार रुपये देण्याबाबत सांगीतले. त्यानुसार मी श्री बिडगर यांना 15 हजार रुपये दिले. त्यानंतर तपास अधिकारी श्री बिडगर यांनी मला उल्हासनगर कोर्टात घेवुन गेले व त्या ठिकाणी 5 हजार रुपये कॅश जामीन घेवुन मला जामीनावर सोडण्यात आले आहे. त्यानंतर श्री बिडगर यांनी उरलेले पैसे 60,000/-रु घेवुन आज दि. 02/01/2026 रोजी भेटण्याकरीता बोलवित आहेत. त्यांनतर दि. 02/01/2026 रोजी श्री बिडगर यांनी माझे मोबाईलवर फोन करुन

उर्वरीत पैसे घेवुन या नाहीतर तुमचे पत्नीला अटक करावी लागेल असे मला सांगीतले आहे. माझी पत्नी सौ ज्योती फुंदे यांचेकरीता कल्याण सेशन कोर्टामध्ये अटकपुर्व जामीन करीता अर्ज केलेला आहे.
वरील प्रमाणे यापुर्वी श्री यादव व बिडगर यांनी घेतलेले पैसे हे माझा चुलत भाऊ अशोक फुंदे यांचेकडुन स्विकारलेले आहेत. तरी यावेळी सुध्दा ते माझे भावाकडुन पैसे घेण्याची शक्यता आहे.

तरी मला श्री संजय बिडगर, सहा पोलीस निरीक्षक यांना अथवा इतर कोणाला ही पैसे देण्याची ईच्छा नाही. माझे त्यांचेशी कोणतेच पुर्ववैमनस्य नाही. तरी श्री संजय बिडगर, सहा पोलीस निरीक्षक व पोलीस अधिकारी श्री यादव यांचेवर आपले विभागाकडुन कारवाई होणेकरीता मी त्यांचे विरुध्द तक्रार देत आहे. सोबत मी माझेवर दाखल गुन्हया संदर्भातील कागदपत्रांच्या छायांकीत प्रती देत आहे.
मला व्यवस्थीत लिहता येत नसल्याने माझे विनंती नुसार मी सांगितलेल्या हकिकती प्रमाणे माझी तक्रार संगणकावर मराठीमध्ये टंकलीखीत केली ती मी वाचुन पाहीली ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.'' वगैरे मजकुराची तक्रार दि. 02/01/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे येथे दिलेली आहे.

वरील प्रमाणे दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार यांचे तक्रारीतील तथ्य पडताळून पाहणे आवश्यक असल्याने दोन शासकीय पंच साक्षीदार यांची सदर कामा करीता नियुक्ती करुन दि. 02/01/2026 रोजी सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये व त्यामध्ये इनसर्ट केलेले नवीन मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचा कोणताही डेटा नसलेबाबत पंचाची खात्री करुन पंच साक्षीदार यांचे समक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार श्री दिनकर फुंदे व लोकसेवक श्री यादव यांचेमध्ये झालेल्या मोबाईलवरील संभाषणामध्ये लोकसेवक श्री यादव यांनी तक्रारदार यांना उल्हासनगर पोलीस स्टेशन येथे भेटण्याकरीता बोलविल्याचे निष्पन्न झाले.

त्यानुसार पुढील पडताळणी करीता उल्हासनगर नं 01 येथे येवुन सर्व कायदेशीर बांबींची पुर्तता करुन तक्रारदार यांना डिजीटल व्हॉईर रेकॉर्डर लावुन पंच नं 01 श्री पानसरे यांचेसोबत उल्हासनगर पोलीस स्टेशन येथे लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता पाठविण्यात आले. सदर वेळी पडताळणी दरम्यान लोकसेवक श्री यादव हे उल्हासनगर पोलीस स्टेशन येथे नसल्याने तक्रारदार यांनी लोकसेवक श्री यादव यांचेशी फोन फोन संपर्क करुन केलेल्या संभाषणामध्ये लोकसेवक श्री यादव यांनी ते उल्हासनगर पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये रुट बंदोबस्त करीता गेलेले असल्याने तक्रारदार यांना भेटणार नसल्याचे सांगुन त्यांनी '' तुम्ही तुमच काम करुन घ्या .... मी सांगेन बिडगर साहेबांना '' असे सांगीतल्याचे निष्पन्न झाले.

त्यानुसार तक्रारदार यांनी दोन्ही पंचा समक्ष लोकसेवक श्री संजय बिडगर, सहा पोलीस निरीक्षक यांना त्यांचे मोबाईलवर फोन केला असता, लोकसेवक श्री बिडगर यांनी तक्रारदार यांना '' एक पाच मिनिट थांबाना ..... लगेच आलो '' असे सांगीतले. त्यानुसार तक्रारदार यांना पुन्हा डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावुन पंच नं 01 श्री पानसरे यांचेसह उल्हासनगर पोलीस स्टेशन येथे लोकसेवक श्री बिडगर यांची भेट घेण्याकरीता पाठविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार व पंच नं 01 हे लोकसेवक श्री बिडगर यांना भेटले असता, लोकसेवक श्री बिडगर यांनी तक्रारदार यांना '' उदयाची तारीख आहे का ? '' असे विचारले. त्यावेळी तक्रारदार यांनी '' बेलची उदयाची च आहे '' असे सांगीतले. त्यावेळी लोकसवेक बिडगर यांनी तक्रारदार यांना '' बेलला जाणार नाही का ते हे तिकड काय गरज तुमची मी जातो ... करुन घेतो ते ...होवुन जाईल उदया बेल... '' असे सांगीतले. त्यावेळी तक्रारदार यांनी '' भावाला पाठवुन देतो ना ...'' असे विचारले असता, लोकसेवक श्री बिडगर यांनी कधी असे तक्रारदार यांना विचारले. त्यावेळी तक्रारदार यांनी '' आता असेल तर लगेच त्याला फोन करतो '' असे सांगीतले. त्यानंतर लोकसेवक यांनी तक्रारदार यांना '' बाकी तेवढ देवुन टाका.....'' असे सांगीतले असता, तक्रारदार यांनी '' टोटल ते किती बोलले होते..... एक लाख दया म्हणुन.....'' असे सांगीतले. त्यावेळी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना कोण? असे विचारले. त्यावेळी तक्रारदार यांनी '' यादव साहेब..... एवढे नाही मी चाळीस दिलेत त्यांना आतापर्यंत'' असे सांगीतले असता श्री बिडगर यांनी तक्रारदार यांना '' चाळीस दिले? '' असे विचारले. त्यानंतर तक्रारदार यांनी '' पंचवीस त्यांना दिले ..... पंधरा तुम्ही घेतले त्या दिवशी....'' असे लोकसेवक बिडगर यांना सांगीतले. त्यावेळी त्यांनी तक्रारदार यांना '' आर मी आय. ओ. आहे.... त्यांचा कायच संबध नाही याच्यात '' असे बोलले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना '' आता तुम्हीच दोघांचे त्यांनीच घेतले तुमचे नावांनी पहिले पंचवीस त्यांनी घेतले आणि परवा......'' असे सांगीतले. त्यानंतर लोकसेवक बिडगर यांनी '' नाही ते त्यांचा विषय संपलेला हाय..... आता मी आय.ओ. आहे. .... आता विस करुन टाक ...'' असे बोलुन पैशांची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवक बिडगर यांना '' आजुन विस..... आहेत का तुम्ही?.....माझे भावाला पाठवतो.... '' असे विचारले. त्यावर श्री बिडगर यांनी '' हा मी इथेच आहे.... मी टेबलला आहे ना आज..... '' असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक श्री बिडगर यांना '' ठिक आहे मग भाऊ येईल..... भाऊ जर नसला तर मी येतो '' असे सांगीतले

असता श्री बिडगर यांनी मला '' हां.... लवकर या.... '' असे सांगीतल्याचे निष्पन्न झाले.

लोकसेवक श्री संजय बिडगर सहायक पोलीस निरीक्षक यांनी तक्रारदार यांचेकडुन 20,000/-रु लाचेची मागणी केल्याचे वर झालेल्या पडताळणी नुसार आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्याप्रमाणे त्यांना देण्याकरीता पैशांची व्यवस्था करण्याबाबत सांगीतले. त्यानुसार तक्रारदार यांनी लागलीच पैशांची व्यवस्था करुन सापळापुर्व पंचनामा कारवाई दरम्यान पंचा समक्ष हजर केले असता, सदर 500/-रु दराच्या 40 भारतीय चलनी नोटा असलेल्या एकुण 20,000/-रु रक्कमेस अँन्थ्रासिन पावडर लावुन पंच व तक्रारदार यांना प्रत्याक्षिक करुन सर्व कायदेशी बांबीची पुर्तता करुन सदरची लाचेची अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आलेली रक्कम तक्रारदार यांचे पॅन्टचे खिश्यात ठेवुन देवुन तक्रारदार यांना डिजिटल व्हाँईस रेकाँर्डर लावुन दिल्यानंतर तक्रारदार हे पंच नं 01 श्री पानसरे यांचेसह उल्हासनगर पोलीस स्टेशन येथे जावुन लोकसेवक श्री बिडकर यांची भेट घेतली सदर वेळी तक्रारदार यांनी लोकसेवक बिडगर यांना '' हे वीस हजार रुपये आहेत..... हां.....'' असे बोलुन त्यांचे पॅन्टचे उजवे खिश्यातुन 20,000/-रु लाचेची रक्कम त्यांचे उजवे हाताने बाहेर काढुन लोकसेवक श्री बिडगर यांचे समोर धरली. त्यावेळी लोकसेवक श्री बिडगर यांनी 20,000/-रु लाचेची रक्कम तक्रारदार यांनी स्विकारली व ती त्याचे पॅन्टचे खिश्यात ठेवुन दिली. त्यानंतर त्यांनी तक्रारदार यांना '' त्या प्रथमेशला पण करुन टाका हजर..... एकदाच..... हा त्या दिवसाच काय.... तुम्हाला हजर केल तस त्याला हजर करुन संध्याकाळ पर्यत त्याला काढुन टाकु ना लगेच ...'' असे सांगीतले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना '' चालेल.... चालेल.... '' असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे डाव्या हाताने त्यांचे डोळयावरील चेश्मा काढुन तो त्यांचे शर्टचे खिश्यात ठेवुन पुर्वनियोजीत इशारा केला असता, सापळा पथकाने लोकसेवक श्री बिडगर यांना 19.18 वा रंगेहात ताब्यात घेतले.

अशाप्रकारे लोकसेवक श्री. संजय धोंडिराम बिडगर यांनी त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग करुन तक्रारदार श्री. दिनकर फुंदे व त्यांचे मुलगा, पत्नीवर उल्हासनगर पोलीस ठाणे येथे दाखल गुन्हा रजि नं 1022/26 भान्यासं कलम 118(2), 115(2), 352, 189(2), 190, 191 (1), 191(2), 191(3) सह मपोका कलम 37(1), 135 प्रमाणे दाखल गुन्हयामध्ये तक्रारदार यांना व त्यांचे पत्नीस मदत करण्याकरिता म्हणुन 20,000/- रुपये ( वीस हजार रुपये ) मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानुसार लागलीच दिनांक 02/01/2026 रोजी करण्यात सापळा पुर्व व सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री.संजय धोंडिराम बिडगर, सहायक पोलीस निरीक्षक, उल्हासनगर पोलीस स्टेशन यांनी तक्रारदार यांचेकडुन मागणी केलेले 20,000/- रुपये लाचेची रक्कम उल्हासनगर पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथील अधिकारी कक्षामध्ये स्वीकारली असता, त्यांना रंगेहाथ ताब्यात घेण्यात आले. म्हणून माझी लोकसेवक श्री. संजय धोंडीराम बिडगर, वय-48, सहायक पोलीस निरीक्षक हे उल्हासनगर पोलीस स्टेशन रा. जनार्दन पोवळेकर चाळ, शहाड गांवठान कोळीवाडा, उल्हासनगर - 01, ठाणे यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 (संशोधन 2018) चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद आहे.

( रुपाली पोळ )

पोलीस निरीक्षक

अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे
दाखल-पोउपनि/वाळके
तपास-पोनि/संतोष नावलगी नेम-लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
RANJIT VASANT WALAKE
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
उल्हासनगर पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SANTOSH GAUBA AI
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):